महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ २० नोव्हेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १४५ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

# एकनाथ शिंदेंनी घेतली अमित शाहांची भेट !



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई : स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका तोंडावर असताना राज्यातील राजकारणात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. सत्ताधारी महायुतीत एकमेकांच्या पक्षातील नेत्यांना प्रवेश देण्यावरून घटक पक्षातील नाराजी उघड झाली आहे. यातच शिवसेनेचे (शिंदे) प्रमुख आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिल्लीचा दौरा करत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी राज्यातील घडामोडींवरून नाराजी व्यक्त केल्याची चर्चा होती. मात्र या भेटीनंतर स्वतः एकनाथ शिंदेंनीच माध्यमांना माहिती देताना शहांसोबत झालेल्या भेटीचे कारण स्पष्टच सांगितले.**

बिहारमध्ये एनडीएचा विजय झाला असला तरी महाराष्ट्रात मात्र एनडीएत वाद सुरू आहेत. त्यामुळे नाराजीतून ही भेट झाली का? असा प्रश्न यावेळी एकनाथ शिंदे यांना विचारण्यात आला. त्यावर ते म्हणाले, तक्रारीचा पाढा वाचून रडणारा एकनाथ शिंदे मुळीच नाही. मी रडणारा नाही तर लढणारा आहे. छोट्या मोठ्या तक्रारी आम्ही राष्ट्रीय पातळीवर आणत नसतो. मंत्रिमंडळाच्या बैठकीवर काल शिवसेनेच्या मंत्र्यांनी बहिष्कार टाकला होता. त्यानंतर आज दिल्ली वारी झाली का? असाही एक प्रश्न शिंदे यांना विचारण्यात आला होता.

या प्रश्नावर ते म्हणाले की, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे प्रश्न इथे राष्ट्रीय पातळीवर मांडायचे नसतात. काल मुख्यमंत्र्याबरोबर बसलो, आमची चर्चा झाली. त्यातून महायुतीला गालबोट न लावण्याचा निर्णय घेतला. महायुतीच्या प्रत्येक पक्षाच्या नेत्याला काल सूचना दिल्या गेलेल्या आहेत.

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी शिवसेनेच्या (शिंदे) काही नेत्यांना पक्षात प्रवेश दिल्यावरून नाराजीनाट्य सुरू झाले, अशी एक अटकळ बांधली जात होती. मात्र एकनाथ शिंदेंनी ही शक्यताही फेटाळून लावली. "रवींद्र चव्हाण यांच्याबाबतचा विषय कालच संपला आहे. त्या विषयाला मी गांभीर्याने घेत नाही आणि घेणारही नाही.

सदर विषय दिल्लीत आणायचे कोणतेही कारण नाही. कालच्या बैठकीत आमच्या लोकांना जे सांगायचे ते मी सांगितले आहे", असे सूचक विधान एकनाथ शिंदे यांनी केले. बिहार निवडणुकीत एनडीएचा मोठा विजय झाला. या विजयाबद्दल अभिनंदन करण्यासाठी मी गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली, असे एकनाथ शिंदे यांनी माध्यमांना सांगितले.

बिहारमध्ये एनडीएचा देदीप्यमान असा विजय झाला. घटकपक्ष म्हणून शिवसेनेलाही या विजयाचा आनंद झाला. उद्या बिहारला जात असताना आज अमित शाहांना भेटून त्यांचे अभिनंदन करण्याचा विचार होता. त्यानुसार आज भेट घेतली.



## देवेंद्र फडणवीस अन् अजित पवारांची बैठक

एकनाथ शिंदे दिल्लीला रवाना झाल्याच कळताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची वर्षा निवासस्थानी बैठक पार पडली. शिवसेना पक्षातील मंत्री आणि एकनाथ शिंदेंची वाढती नाराजी दूर कशी करायची, याबाबत दोन्ही नेत्यांच्या बैठकीत चर्चा पार पडली. एकनाथ शिंदे यांची नाराजी वाढत गेलीच तर पुढं काय करायचं याबाबतही बैठकीत चर्चा झाल्याची विश्वसनीय सूत्रांची माहिती आहे. त्यामुळे, महायुतीतमध्ये तीन पक्षात आलबेल नसल्याचं उघड झालं आहे. दरम्यान, आमच्यात कुठलीही नाराजी नाही, कुंटुंब म्हटल्यावर थोडं फार होतच असतं, असे स्पष्टीकरण शिवसेना मंत्री तथा नेते प्रताप सरनाईक यांनी नाराजीच्या चर्चांवर स्पष्टीकरण दिले होते. तर, एकनाथ शिंदेंनी नाराजीच्या चर्चांवर बोलणे टाळले होते.

## लक्षवेधी

## पालघरमध्ये गादी कंपनीला भीषण आग

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

पालघर येथली वाडा तालुक्यातील कोना ग्रामपंतायतीजवळ एमआयडीसीतील गादी कंपनीला भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. या आगीत दोन कामगार होरपळले असून त्यांची अवस्था गंभीर आहे. या आगीत 23 कोटींचे नुकसान झाले आहे.

बुधवारी सकाळी दहाच्या सुमारास ही आग लागली. आगीने काही वेळातच रौद्र रुप घेतले. कारखान्यात गादी बनवण्यासाठी लागणारा फोम असल्याने मोठा भडका उडाला आहे. यामध्ये काही कामगार गंभीर जखमी झाले आहेत. अजय रावत (35), राणी रावत (32) अशी जखमींची नावे आहेत. वाड्यातील खासगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु आहे. कोन येथे भगवान पुष्पदंत इंडस्ट्रीयल प्रा. लिमिटेड या कंपनीत फोमचे उत्पादन केले जाते. सकाळी साडेनऊच्या सुमारास अजय नावाचा कामगार बॉयलरजवळ काम करत असताना अचानक बॉयलरचा स्फोट झाला आणि आग पसरली. बॉयलरजवळ त्या कामगाराची पत्नी राणीही होती. यात दोघेही गंभीर जखमी झाले आहे. त्यांना रुग्णालयात दाखल केले आहे, या आगीत 23 कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे कंपनीचे मालक भरत जैन यांनी दिली आहे.

## वालधुनी नदीवर दुसरा पादचारी पूल

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

वालधुनी नदीवर दुसरा पादचारी पूल उभारण्यात येत आहे. या पुलामुळे विद्यार्थी, महिला तसेच विद्यार्थ्यांची मोठी सोय होणार असून लवकरात लवकर हे काम पूर्ण करण्याचे आदेश उल्हासनगर महापालिकेच्या मनीषा आव्हाळे यांनी दिले आहे. या नव्या पुलामुळे नागरिकांना पर्यायी मार्ग उपलब्ध होणार आहे. उल्हासनगर रेल्वे स्थानकासमोर वालधुनी नदीवर 45 वर्षांपूर्वी चांदीबाई महाविद्यालयाकडे जाणारा पूल उभारला होता. या पुलाची अनेकदा दुरुस्ती करण्यात आली. तसेच दोन वर्षांपूर्वी आलेल्या पुराचे पाणीदेखील पुलावरून गेल्याने पाइप व फरशा वाहून गेल्या होत्या. जुना पूल कमकुवत झाला आहे, त्याचे खांबही गंजले आहेत. दिवसेंदिवस पुलावरील वाहतूक वाढत गेल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला.

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ. धीरज चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली नवा पादचारी पूल उभारण्याचे काम हाती घेतले आहे. त्याची पाहणी नुकतीच अधिकाऱ्यांनी केली. पुलाच्या कामामध्ये मंदिर तसेच जुना जकात नाका बाधित होत असून त्यावर लवकरच तोडगा काढण्यात येईल अशी माहिती उपअभियंता संदीप जाधव यांनी दिली. सर्व अडथळे दूर करून पुलाचे काम पूर्ण केले जाणार आहे.



## ठाण्यात बेकायदेशीर व्यावसायिक गॅस विक्री ६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

ठाणे - व्यावसायिक गॅस सिलेंडरचा ठाणे शहरात मोठ्या प्रमाणात काळाबाजार होत असल्याचे आढळत आहे. वागळे इस्टेट येथील दालमिल नाका परिसरात शिधावाटप फ परिमंडळाचे उपनियंत्रक यांच्या पथकाने मंगळवारी गॅस टेम्पोवर मोठी कारवाई केली. या कारवाईत १९ किलो वजनांचे भरलेले १६ आणि रिकामे ४९ सिलेंडर तसेच ६ लाख ५० हजार किंमतीचा मुद्देमाल पथकांने जप्त केला आहे.

ही कारवाई शिधावाटप फ परिमंडळचे उपनियंत्रक प्रशांत काळे यांच्या मार्गदर्शनाखाली शिधावाटप फ परिमंडळाचे सहाय्यक नियंत्रक प्रदिप काळे, यांच्या समवेत फिरते पथकांने केली. फिरत्या पथकाने वागळे इस्टेट रोड क्रमांक २२ येथील दालमिल नाका परिसरात अचानक छापा टाकला असता, टॅम्पोमध्ये अवैधरित्या व्यावसायिक वापराचे विविध तेल कंपनीचे गॅस सिलेंडर साठवून ठेवल्याचा प्रकार उघडकीस आला. या कारवाईत पथकाने १९ किलो वजनांचे भरलेले १६ आणि रिकामे ४९ सिलेंडर तसेच टेम्पो त्यासोबतच ६ लाख ५० हजार ६७२ किंमतीचा मुद्देमाल पथकाने जप्त केला आहे. संबंधित गुन्हा श्रीनगर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आला आहे.

# अंबरनाथच्या राजकीय समिकरणात बदल !

### निवडणुकीच्या तोंडावर शिवसेनेला धक्का

### शिवसेनेचे माजी नगरसेवक पांडुरंग खराडे यांची काँग्रेसमध्ये 'घरवापसी'

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**अंबरनाथ, ता. १९ : अंबरनाथच्या राजकारणात वेगाने समीकरणे बदलत असून, पालिका निवडणुकीच्या तोंडावर शिवसेनेला मोठा धक्का बसला आहे. शिवसेनेचे माजी नगरसेवक पांडुरंग खराडे यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह काँग्रेसमध्ये 'घरवापसी' केली आहे. या पक्षप्रवेशामुळे काँग्रेसची ताकद वाढली आहे. माजी नगरसेवक पांडुरंग खराडे यांनी शिवसेना सोडत शहर अध्यक्ष प्रदीप पाटील यांच्या उपस्थितीत काँग्रेसमध्ये प्रवेश केला. पालिका निवडणुका तोंडावर असताना शिवसेनेने तिकीट नाकारल्यामुळे नाराज झालेले खराटे यांनी पुन्हा काँग्रेसमध्ये परतण्याचा निर्णय घेतला. "मला काँग्रेसनेच राजकीय आयुष्य दिले. आता पुन्हा घरवापसी करत आहे," असे सांगत त्यांनी शिवसेनेला रामराम केला.**

खराटे यांनी यापूर्वी दोन वर्षे काँग्रेसकडून आणि दोन वर्षे शिवसेनेत राहून असे एकूण चार वर्षे नगरसेवकपद भूषवले आहे. त्यांच्या पुनर्प्रवेशामुळे वॉर्ड क्रमांक ९ (उलनचाल परिसर) मध्ये काँग्रेसची ताकद वाढली असून कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. याप्रसंगी रिक्षाचालक मालक संघटना, खान्देश महामंडळ, आंध्र समाज आणि बबर लांघा संघ यांनी काँग्रेसला जाहीर पाठिंबा दिल्याचे शहर अध्यक्ष प्रदीप पाटील यांनी सांगितले. शहर अध्यक्ष प्रदीप पाटील यांनी या वेळी आत्मविश्वास व्यक्त केला की, काँग्रेस सोडून शिवसेनेत गेलेले आणि दुखावलेले बहुतेक कार्यकर्त्यांची पुन्हा घरवापसी होईल. पाटील यांच्या या वक्तव्यामुळे अंबरनाथच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

# बदलापूरात बॅनरवॉर !

### भाजप राष्ट्रवादी युतीच्या उमेदवाराचे अधिकृत प्रचार बॅनर काढले

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**बदलापूर, ता. १९**

बदलापूर नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शांतीनगर परिसरात बॅनरबाजीवरून मोठा वाद निर्माण झाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि भाजप युतीचे पॅनेल क्र.१ चे उमेदवार आणि राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष प्रभाकर पाटील यांनी पोलिसांच्या अधिकृत परवानगीने लावलेले प्रचार बॅनर रात्रीच्या वेळी अज्ञात व्यक्तींनी काढून टाकले. या घटनेनंतर प्रभाकर पाटील यांनी तातडीने बदलापूर पश्चिम पोलिस ठाण्यात औपचारिक अर्ज दाखल केला आहे.

अधिकृत परवानगी घेऊन लावलेले प्रचार साहित्य परस्पर काढून टाकणे हा निवडणूक आचारसंहितेचा भंग असून, यामागे राजकीय वैमनस्य असण्याची शक्यता पाटील यांनी व्यक्त केली आहे. त्यांनी संबंधित समाजकंटकांविरोधात कायदेशीर कारवाई करण्याची मागणी पोलिसांकडे केली आहे. प्रभाकर पाटील यांच्या विरोधात याच पॅनेलमध्ये शिवसेना शिंदे गटाकडून तुकाराम म्हात्रे आणि गौरी वाघ हे उमेदवार रिंगणात आहेत.

निवडणुकीचे वातावरण तापू लागलेल्या बदलापूरमध्ये अशा प्रकारचे अनुचित प्रकार पुन्हा घडू नयेत यासाठी पोलिस प्रशासनाने अतिरिक्त सतर्कता ठेवून प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी स्थानिक स्तरावर जोर धरू लागली आहे. हा प्रकार राजकीय दृष्टीने संवेदनशील बनला असून, बॅनर काढण्याच्या घटनेमुळे संबंधित प्रभागाला 'अतिसंवेदनशील प्रभाग' म्हणून पाहिले जात असल्याची चर्चा आहे.

## कल्याण, डोंबिवलीतील स्मशानभूमींमध्ये सौर यंत्रणा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** - महावितरणचा वीज पुरवठा खंडित झाल्यावर कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील स्मशानभूमींमध्ये अंधार पडत होता. त्यामुळे नागरिकांना पार्थिवावर अंत्यसंस्कार करताना अडचणी येत होत्या. स्मशानभूमीतील अंधाराविषयीच्या तक्रारी वाढल्यानंतर आयुक्तांनी पालिका विद्युत विभागाला पालिका स्मशानभूमींमध्ये २४ तास वीज पुरवठा सुरळीत राहील यादृष्टीने नियोजन करण्याचे निर्देश दिले होते. त्याप्रमाणे विद्युत विभागाने कल्याण, डोंबिवलीतील दहा स्मशानभूमींमध्ये सौर उर्जेवर चालणारी यंत्रणा कार्यान्वित करण्याचा निर्णय घेतला आहे. ही यंत्रणा कशा पध्दतीने काम करते हे तपासण्यासाठी कल्याणमधील लालचौकी, सांगळेवाडी येथील स्मशानभूमींमध्ये प्रायोगिक तत्वावर ही यंत्रणा सुरू करण्यात आली. ही यंत्रणा चांगल्यारितीने काम करत असल्याचे तपासणीत दिसल्याने आयुक्त अभिनव गोयल यांच्या निर्देशावरून पालका विद्युत विभागाचे अतिरिक्त शहर अभियंता प्रशांत भागवत यांनी कल्याण, डोंबिवली शहरातील दहा स्मशानभूमींमध्ये सौर उर्जेवर चालणारी यंत्रणा बसविण्याचा निर्णय घेतला आहे.

# निवडणुकीत उतरलेल्या सर्व शिलेदारांची धाकधूक शिगेला

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**बदलापूर, ता. १९ कुळगाव-बदलापूर नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण होताच, आता अर्ज छाननी प्रक्रियेमुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. प्रशासनाचा संथ वेग आणि कागदपत्रांच्या तपशीलवार तपासणीमुळे उमेदवार, सूचक आणि अनुमोदकांना नगर परिषदेत दिवसभर ताटकळत राहावे लागले.**



**अर्ज छानणी पूर्ण झाल्यावर अर्ज मागे घेण्याची मुदत १९ ते २१ नोव्हेंबर अशी आहे. त्यामुळे निवडणुकीच्या अंतिम रिंगणात कोण-कोण उमेदवार उतरतात, हे शुक्रवारी (२१ नोव्हेंबर) स्पष्ट होणार आहे. या महत्त्वपूर्ण टप्प्यामुळे निवडणुकीत उतरलेल्या सर्व शिलेदारांची धाकधूक शिगेला पोहोचली आहे.**

अर्ज छाननीसाठी मंगळवारी (ता. १८) सकाळी ११ वाजल्यापासूनच नगर परिषदेत उमेदवारांची मोठी गर्दी झाली होती. कागदपत्रांची तपासणी अत्यंत धीम्या गतीने सुरू असल्याने संध्याकाळपर्यंतही किती अर्ज अंतिम ठरले आणि किती बाद झाले, याबाबत स्पष्टता मिळाली नव्हती. प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, नगराध्यक्षपदासाठी दाखल झालेल्या सहा अर्जांपैकी वंचित बहुजन आघाडीच्या रेश्मा गवाणे यांचा अर्ज छाननीत बाद झाल्याचे समोर आले आहे. ४९ प्रभागांतील २४ पॅनेलांसाठी तब्बल २३० अर्ज दाखल झाले आहेत, तर नगराध्यक्षपदासाठी सहा अर्ज जमा झाले होते. प्रत्येक अर्जाची तपशीलवार पडताळणी करण्यात वेळ जात असल्याने २४ पॅनेलची छाननी एका दिवसात पूर्ण होणे कठीण ठरले.







# उल्हासनगरमध्ये 723 कोटींचा भव्य गृहनिर्माण प्रकल्प

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**उल्हासनगर** : उल्हासनगर महानगरपालिकेने शहरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना परवडणारी, सुरक्षित आणि दर्जेदार घरे उपलब्ध करून देण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मोठा गृहनिर्माण प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पासाठी तब्बल ३ हजार ५७८ घरांच्या उभारणीसाठी ७२३ कोटी ११ लाख रुपयांची निविदा जाहीर करण्यात आली आहे. उल्हासनगरच्या कॅम्प पाच येथील प्रेम नगर टेकडी येथे आणि कॅम्प चार येथील संतोष नगर येथे प्रत्येकी १ हजार ७८९ घरांची उभारणी केली जाणार आहे. या प्रकल्पामुळे शहरातील झोपडपट्टी, बैठ्या चाळी आणि दाटीवाटीच्या वस्त्यांमध्ये राहणाऱ्या नागरिकांना हक्काचे चांगले घर मिळू शकणार आहे. उल्हासनगर शहरातील अनधिकृत बांधकामांच्या प्रश्नावर येत्या काळात कायमस्वरूपी तोडगा मिळू शकतो. मात्र उल्हासनगर आजही देशातील सर्वाधिक दाटीवाटीच्या शहरांपैकी एक शहर आहे. येथील एक चटईक्षेत्र निर्देशांकात सर्वाधिक लोकसंख्या वास्तव्यास आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी झोपडपट्टी, बैठी घरे आहेत. परवडणाऱ्या घरांच्या माध्यमातून शहरात गृहप्रकल्प उभे राहावेत यासाठी स्थानिकांची मागणी होती.

## संपादकीय

### ठाणे जिल्ह्यातील सत्तासमीकरणे कोसळणार ?

ठाणे जिल्ह्यातील राजकारण आज स्फोटक टप्प्यात पोहोचले आहे. अनेक वर्षांच्या गोटबाजीतून, गटांतील निष्ठांमधून आणि एकहाती वर्चस्वातून तयार झालेली समीकरणे आता टिकू शकतील का—हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. ठाण्यातील राजकीय जमीन हलते आहे, आणि हा भूचाल संपूर्ण राज्याच्या सत्तारचनेला हलवू शकतो.

**१.'अखंड सत्ता' म्हणवून घेणाऱ्या गटात अंतर्गत दरी वाढतेय**

ज्यांनी ठाण्याच्या राजकारणावर दशकानुदशके नियंत्रण ठेवले, त्यांच्या गोटात आज भेगा स्पष्टपणे दिसू लागल्या आहेत. ज्यांना कंठशोष करून पुढे आणले, तेच आज स्वतःचा स्वतंत्र गट तयार करण्याच्या हालचाली करत आहेत. निष्ठा तुटतात, नवीन समीकरणे तयार होतात—आणि त्या सगळ्याच्या पार्श्वभूमीवर 'नेतृत्व' नावाचा प्रश्न गंभीर बनला आहे.

**२. नाराजांचे फॉर्म्युला—"थांबा आणि पाहा" नाही, आता "उडी मारा"**

आज ठाण्यात नाराजांची संख्या एवढी वाढली आहे की तो स्वतःच एक स्वतंत्र "गट" मानला जाऊ शकतो. पक्षांतर्गत अन्याय, तिकिटवाटपातील गोंधळ, स्थानिक पातळीवरील दुर्लक्ष—यामुळे काहींनी थेट नवीन पर्यायांची दारे ठोठावणे सुरू केले आहे. उघड बोलले नसले तरी अनेकांनी मनोमन निर्णय घेतलाच आहे: "पक्ष बदलला तर ठाण्यातील राजकारण एकतर्फी होईल, पण न बदलल्यास कारकीर्द धोक्यात."

**३. सत्ता टिकवण्यासाठी अदृश्य सौदे—पाठीमागचे खेळ सुरू**

ठाण्यातील अनेक भागांत अदृश्य राजकीय सौद्यांची चलती सुरू आहे. जिथे वाद असतो, तिथे तडजोड असते; पण ठाण्यात आता तडजोडी देखील संशयास्पद होत आहेत. कोण कोणासोबत आहे, कोण कोणाच्या विरोधात आहे—याचा ठोस अंदाज लावणेसुद्धा कठीण झाले आहे. गोटबाजीपेक्षा आता "स्वार्थसमीकरणे" जास्त महत्त्वाची ठरत आहेत.

**४. मतदार शांत, पण निर्णायक—'काम नाही तर मत नाही'**

ठाणे जिल्ह्याचा मतदार पूर्वीसारखा कुणाचा ब्लाइंड-फॉलोअर राहिलेला नाही. रोजच्या समस्या—वाहतूक, पाणी, पायाभूत सुविधा, रस्ते, प्रदूषण—यामुळे मतदार अस्वस्थ आहेत. नेतृत्व किती दमदार हे नसून, काम किती झाले—हाच आता मतदारांचा निकष आहे. ज्यांनी खऱ्या अर्थाने काम केलेले नाही, त्यांना या वेळी मतदार थेट झटका देणार हे स्पष्ट आहे.

**५. येणाऱ्या निवडणुका ठाण्याचे भवितव्य ठरवतील**

ठाणे महापालिका असो, जिल्हा परिषद असो किंवा विधानसभा—येणाऱ्या निवडणुका ठाण्यातील राजकारणातील मोठा टर्निंग पॉइंट ठरणार आहेत. जुने किल्ले उद्ध्वस्त होऊ शकतात, नवीन शक्तिकेंद्रे उभी राहू शकतात. काही पक्षांना वाटणारा 'अभेद्य प्रदेश' यावेळी भेगांनी भरून जाईल, तर काही नवे चेहरे लोकप्रियतेच्या शिखरावर जातील.

**शेवटचा मुद्दा — ठाणे जिल्हा आता स्फोटाच्या उंबरठ्यावर**

जुनी समीकरणे टिकणार नाहीत. नवी समीकरणे अजून आकार घेत आहेत. पक्ष बदल, गोटबदल, अदृश्य सौदे आणि नाराजी—हे सर्व घटक एकत्र येऊन ठाण्याचे राजकारण नव्या रूपात जन्म घेत आहे. येणाऱ्या काही महिन्यांत ठाणे जिल्हा हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा राजकीय 'गेम-चेंजर' ठरू शकते.

# राज्यात अँटी लँड ग्रॅबिंग अॅक्ट लागू करा - सुनील घनवट



महाराष्ट्रातील देवस्थानांच्या हजारो एकर जमिनी भूमाफियांनी, महसूल अधिकाऱ्यांच्या संगनमताने बेकायदेशीरपणे हडपल्या आहेत. या गंभीर समस्येवर तोडगा काढण्यासाठी, गुजरात व कर्नाटकच्या धर्तीवर कठोर 'अँटी लँड ग्रॅबिंग अॅक्ट' लागू करावा, अशी जोरदार मागणी महाराष्ट्रातील २२ जिल्ह्यांतील १,००० हून अधिक मंदिर विश्वस्तांनी एकाच वेळी केली. मंदिर महासंघाच्या नेतृत्वाखाली ही मागणी मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांना निवेदनाद्वारे करण्यात आली. महसूल राज्यमंत्री श्री. योगेश कदम यांच्यासह सुमारे २२ जिल्हाधिकारी, तहसिलदार, तसेच आमदार यांना ३०० हून अधिक निवेदने सादर करण्यात आली आहेत.

या राज्यव्यापी अभियानात रायगड येथील श्री हरिहरेश्वर, साताऱ्याचे श्री सज्जनगड, पालीतील श्री बल्लाळेश्वर, वसईचे श्री परशुराम तपोवन, नाशिकचे श्री मुक्तीधाम, आकोट-अकोल्याचे श्री कान्होबा, रत्नागिरीचे श्री काशी विश्वेश्वर, कोल्हापूरचे श्री उजळाई व अनेक क्षेत्रातील मंदिरांचा, तसेच महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या राज्य स्तरीय कोअर टीमच्या सर्व सदस्यांनी सहभाग घेतला. विविध जिल्ह्यातील हिंदुत्वनिष्ठ संघटनांसह अकोला येथील १६० अधिवक्त्यांनी या उपक्रमात सहभागी झाले. तर वसई येथे संत बी.पी. सचिनवाला यांची उपस्थिती होती.

मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट यांनी म्हटले केले की , देवस्थानांच्या इनाम जमिनी (वर्ग-३) कायद्याने अहस्तांतरणीय असतांनाही, महसूल विभागातील भ्रष्टाचारामुळे भूमाफियांना मुक्त संधी मिळाली असून हजारों एकर जमिनी हडपल्या आहेत. केवळ पश्चिम महाराष्ट्रातच ६७१ गटांवर थेट अतिक्रमण झाले आहे; विदर्भातील अमरावती, अकोला जिल्ह्यांत ५० कोटींची जमीन केवळ ९६० रुपयांना विकल्याचे समोर आले आहे.सर्वोच्च न्यायालय (२००७) आणि मुंबई उच्च न्यायालय (२०२५) यांनी धार्मिक संस्थांच्या मालमत्तेचे संरक्षण राज्याचे कर्तव्य असल्याचे निर्देश दिले आहेत. तरीही फौजदारी कायद्याअभावी भूमाफियांना मोकळे रान मिळाले आहे. प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित राहत असल्यामुळे मंदिरांना न्याय मिळत नाही. गुजरातमध्ये 'जमीन हडपणे' अजामीनपात्र व दखलपात्र गुन्हा असून १४ वर्षांपर्यंत तुरूंगवास व बाजारमूल्याएवढा दंडाची तरतूद आहे.

या कायद्याप्रमाणे महाराष्ट्रात अध्यादेश तात्काळ लागू करण्यात यावा. येत्या अधिवेशनात कायदा संमत करावा. यातील गुन्हे दखलपात्र-अजामीनपात्र असावेत. मागील २०-२५ वर्षांतील जमीन हस्तांतरणांची चौकशीसाठी उच्चपदस्थ पोलीस-महसूल अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली राज्यस्तरीय विशेष तपास पथक स्थापन करावे. प्रत्येक विभागात विशेष जलदगती न्यायालये स्थापन करून खटले ६ महिन्यांत निकाली काढावेत.

महसूलमंत्री मा. चंद्रशेखर बावनकुळे यांनी जमीन व्यवहारांवर बंदी व समिती स्थापनेचे आश्वासन दिले आहे, मात्र त्याची कठोर अंमलबजावणी करण्यात यावी. मंदिरांना दैनंदिन खर्चासाठी भक्तांपुढे हात पसरावे लागतात, तर भूमाफिया कोट्यवधींच्या जमिनीवर मजा मारतात. ही परिस्थिती महाराष्ट्रासाठी साजेशी नाही. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्शानुसार देवस्थानांचे रक्षण करण्यासाठी शासनाने ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा मंदिर महासंघासह मंदिर विश्वस्तांनी व्यक्त केली आहे.

## ठाणे जिल्हा परिषदेत

# स्व. इंदिरा गांधी जयंती व राष्ट्रीय एकात्मता दिन साजरा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत आरोग्य विभागामार्फत भारताच्या माजी पंतप्रधान स्वर्गीय इंदिरा गांधी यांची जयंती आज साजरी करण्यात आली. यानिमित्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर उपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांनी राष्ट्रीय एकात्मता दिनाची शपथ ग्रहण केली.

यावेळी डॉ. गंगाधर परगे यांनी स्व. इंदिरा गांधी यांच्या कार्याबद्दल मनोगत व्यक्त करताना सांगितले की, "इंदिरा गांधी यांनी देशाच्या अखंडता, प्रगती आणि सुरक्षा यासाठी आयुष्यभर कार्य केले. त्यांची दूरदृष्टी, नेतृत्वगुण आणि राष्ट्रप्रेम आजही प्रेरणादायी आहे. राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाची आहे."

कार्यक्रमाला जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. स्वाती शिंदे, जिल्हा आयुष अधिकारी डॉ. बालाजी गावडे, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी संजय जाधव तसेच आरोग्य विभागातील इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

स्व. इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त आयोजित हा उपक्रम राष्ट्रीय एकता, सामाजिक सलोखा आणि देशहितासाठीची बांधिलकी मजबूत करणारा ठरला.

# आंतरराष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत मैत्रेय मोकलला सुवर्णपदक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**पेण** : १५ ते १७ नोव्हेंबर २०२५ दरम्यान थिम्पू, भूतान येथे आयोजित आंतरराष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत जसखार, ता. उरण, जि. रायगड येथील मैत्रेय राजश्री गणेश मोकल यांनी ९३ किलो वजनी गटामध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक (GOLD MEDAL) पटकावले आहे.

यापूर्वी, दिनांक १८ ते २१ ऑगस्ट २०२५ दरम्यान टाटानगर, झारखंड येथे आयोजित राष्ट्रीय स्पर्धेत त्यांनी रौप्यपदक जिंकले होते. त्या उल्लेखनीय कामगिरीच्या आधारावर त्यांची आंतरराष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी निवड झाली होती.

मैत्रेय यांना शिवछत्रपती पुरस्कार विजेते संतोष शिंदे यांचे मार्गदर्शन व मोलाचे सहकार्य लाभले. त्यांची जिद्द, चिकाटी आणि अथक प्रयत्न यांच्या जोरावर त्यांनी हे यश संपादन केले आहे. या स्पर्धेसाठी अध्यक्ष, जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण यांनी आर्थिक निधी उपलब्ध करून मैत्रेयला मोलाचे सहकार्य केले व आशीर्वाद दिले.

या स्पर्धेत जगभरातून १५० स्पर्धक सहभागी झाले होते. भारतातून एकूण ३० स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. मैत्रेय यांच्या या सुवर्णमयी कामगिरी बद्दल त्याचे सर्वत्र मनःपूर्वक कौतुक होत आहे. तसेच त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# कृष्णविवर ठाव मनाच्या गाभ्याचा



प्रायोगिक नाटक म्हटल्यावर त्यात पुढे काय असेल असे प्रत्येक प्रेक्षकाला वाटत राहील असा नाटकाचा प्रयोग होतो त्यापैकी हा ' कृष्णविवर'. नावाप्रमाणेच मनाच्या अंतरंगातील गाभाऱ्यातील विषयांना स्पर्श करणार अस हे नाटक.

आशय नाट्य संस्था कल्याण आणि द क्रिएट यू स्टुडिओ कल्याण यांनी निर्मित केलेले तसेच कल्याण तालुका शिक्षक सामाजिक शैक्षणिक संस्था प्रस्तुत या दोन अंकी प्रायोगिक नाटकाचे लेखक - दत्ता पाटील यांनी या कृष्णविवर नाटकाला नावाप्रमाणेच न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे.


वर्तमानपत्रात काम करणाऱ्या संपादकांचे आयुष्य अगदी वस्तुतः मांडले आहे. संपादक असल्यामुळे वृत्तपत्रासाठी काम करणाऱ्या सहकाऱ्यांना देत असलेले सल्ले, पहिल्या पानावर पहिली बातमी कोणती घ्यायची. अशा वास्तविक प्रश्नात हात घालून संपादक दर्शन यांची भूमिका चेतन पवार यांनी उत्तम प्रकारे मांडली आहे. नाटकातील नायक त्याच्या वृत्तपत्र आणि घर अशा वैयक्तिक आयुष्यात व्यस्त असताना अचानक नायकाची जुनी मैत्रीण सरिता देशमुख या नायिकेच तिथे आगमन होतं. एकमेकांच्या आयुष्यात काय चाललंय याचा ठाव घेता घेता नव्या जुन्या गप्पागोष्टी चालू होतात. त्याची मैत्रीण आल्यानंतर आता पुढे काय होईल याचे कुतूहल प्रेक्षकांना वाटते.तिच्यासाठी चहा करत असताना ती घरात स्त्रीचा वावर नसल्याने त्याच्या संसारी न होण्याचं कारण शोधू लागते. चहा घेताना मनातील अंतर्बाह्य स्थितीच्या गुंतागुंत्यात अडकलेल्या भावभावनांची वैचारीकदृष्ट्या गंभीर पण मनाचा तळ न समजणारी चर्चा होते. अगदी नाटकाच्या नावासारखी कृष्णविवर सत्यापर्यंत पोहोचण कठीण असते अशाप्रकारची. मग दोघांच्या चाललेल्या संवादात तो येणाऱ्या फोनवर बोलत असताना त्याचा संपादक म्हणून तो कामाप्रती किती निष्ठावान आहे याची तिला अनुभूती येते. मग बोलता बोलता पुढे निर्मला मानेचे काय झाले, किंवा न्यूज चॅनेल बद्दलची मत जाणून घेण्याबद्दल तिचे बोलणे झाले.त्याबद्दल जाणून घ्यायची उत्सुकता प्रेक्षकांच्या मनात ही झाली असेल.

'प्रखर बुद्धिवाद सामुहिक कधीच नसतो. त्याने एकाधिकारशाही जन्माला येते, म्हणून बुद्धिवादी, विद्रोही समूह करत नाहीत.'असे त्याचे विषय चालू असतात. शिवाय वृत्तपत्रातील सगळी काम करणारी माणसे ही त्या त्या कामाची सॉफ्टवेअर असतात. अशा त्याच्या चाललेल्या चर्चेबरोबरच त्याच्या 'वैयक्तिक आयुष्याशी सरिता नकळतपणे जोडली जात असते; आणि तीही त्याच्यासारखीच तुझ्याशी बोलताना विचारांचा तळ सापडत नाही. अशा उपरोधिक सखोल आणि खोचक बोलण्यात वाहवत जाते. दोघांमध्ये आंतरिक मनाची स्थित्यंतरे आणि सत्यता यावर चर्चा होत असताना मधेच लागलेल्या ' ऐसे काही व्हावे मन शांत निजावे ' ह्या गीतावरून त्याच्या आयुष्यातील एकाकीपणाची कल्पना आली. संवादात तिच्या वैवाहिक जीवनाबद्दल चर्चा होते. त्यात ती मी ' रमले स्वतःमध्येच' असं दोन शब्दात खूप काही दडलंय अशा प्रकारे उत्तर देते. मग विषय श्याम नावाच्या मित्राकडे जातो. श्याम हा त्यांच्या कॉलेज जीवनातील मित्राच्या आठवणी काढताना संदिग्धता व वेडी माणसे, समाजवादावरून हिंदुत्ववादावर रूपांतरित झालेला श्याम यावर भाष्य करत हार्मोनियम वाजवून दाखवत ' समर्थ आम्ही ध्येय वेडे 'ह्या श्यामच्या कॉलेजच्या आठवणीतील गाण्यात दोघंही रमतात.मग मात्र ती घरी जायला निघते. तेव्हा बायका घुसमटत जगतात. अस दर्शन त्याचे मत मांडतो. दिवसागणिक मनात विचारांचे काहूर माजलेल्या अवस्थेत एकटेपण घालवण्यासाठीची 'मोजार्टची सिम्फनी' अस नाव देत त्याची रोजची सवय दर्शन सरीताला हसण्यावारी नेऊन दाखवतो. अशा रीतीने दिवस मावळतो.

मध्यांतरानंतर परत एकदा गुन्हेगारी, राजकारण या विषयावर फोनवर चालू असलेल्या दर्शनच्या संवादात नायिकेशी बोलून मिळालेला लेखाचा विषय याबद्दल ऐकून ती अस्वस्थ होते. उत्तरार्धात लग्नाच्या बंधनात अडकून सुद्धा एकाकी आयुष्य जगण्याच्या तिच्या घालमेलीतून तिची झालेली मनाची कोंडी लक्षात येते. राजेश शिंदे यांची प्रकाश योजना नायक - नायिका भूमिका सादर करत असताना अभिनयाला भावनिक जोड देते. पात्रांमध्ये असलेली भावनिक ओढ चांगलीच लाऊन धरलेली असल्यामुळे प्रेक्षकांच्या नजरा सुरुवातीपासून शेवटपर्यंत स्तब्ध राहिल्या होत्या. सुरुवातीला अनेक भावना मनात साठवून जड अंतःकरणाने आलेली आणि जाताना काहीशी मनातून हलकी झालेली सरिता तसेच एकाकीपणातून आलेला कोरडेपणा तरीही शेवटी सरिता निघून गेल्यावर लागणारी रुखरुख अशी दोघांची भूमिका साकारत नाटकाचा शेवट प्रेक्षकांचे मन हेलावणारा होता. वृत्तपत्रीय विश्व आणि लग्न झालेल्या स्त्रीची कोंडी दाखवताना त्यात आणखी काही न बोलता; पण मनाला भिडणाऱ्या अशा अवस्था दाखवता आल्या असत्या. तिच्याकडे सर्व काही असून मनातील अपूर्णता आणि दर्शनला त्याची जाणीव होते. हि स्थिति दर्शनविषयी वाटणारी ओढ दर्शवत होती. नायकाच्या घरातील जेवण करणारी मावशी तसेच सरीताचा नवरा ह्यांचा रंगमंचावर अभिनय नसून संदर्भ कलावंतांच्या भावविश्वाशी निगडीत दिसून आला. एकीकडे नायकाचं असलेल कोरडेपण असा अवरोध आणि तरी सुद्धा कॉलेजमध्ये असताना बुचाची फूल गोळा करतानाचा प्रसंग मांडून दिग्दर्शकांनी भावनांचा हळवेपणा जपल्याच दिसतं. वैचारिक दर्जा जपून नाटकातील विषय प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्यास कलावंतांना यश आलं आहे. तिला स्वतःचा नवरा कसा आहे हे सांगताना आणि दर्शनचे आयुष्य पाहता तिला त्याच्या आयुष्याविषयी वाटणाऱ्या आकर्षणाबद्दल आणखी काही गोष्टी उलगडून दाखवता आल्या असत्या तर?

नाटकाच्या शेवटाला वरवर कोणीही स्वतःच्या आयुष्यात छान चाललय अस दाखवत असल तरी अंतर्मनाची स्थिती काही वेगळीच असते. आणि त्याचा वेध घेणं हे कठीण असतं ह्या संकल्पनेला नावानुरुप मांडण्यात यश आले आहे असे दिसून आले. दोनच पात्र असून विषयाला उचलून धरण्यास कलावंतांना उत्तम यश आलेले दिसते. शिवाय त्याला अनुकूल असं नेपथ्य व रंगभूषा होती.





| |
|---|
| लेखक - दत्ता पाटील |
| दिग्दर्शक - चेतन पवार |
| सुत्रधार - अजय पाटील आणि नेहा थोरात |
| नेपथ्य - चेतन पवार |
| संगीत - विशाल घनघाव - नितिन नाडेकर |
| प्रकाश योजना - राजेश शिंदे |
| रंगभूषा - नेहा थोरात, साक्षी नन्नावरे |
| वेशभूषा - अमिष कुलकर्णी -विवेक वेखंडे |
| रंगमच सहाय्य - मैत्रेय शिरतुरे , त्रिशीका थोरात |
| चैतन्य देशमुख |
| भूमिका आणि कलावंत |
| सरिता - प्रणाली राऊत |
| दर्शन - चेतन पवार |

## भविष्यवेध



गुरुवार
२० नोव्हेंबर २०२५

**मेष**
आवश्यक गोष्टी व्यवस्थित ठेवा जेणेकरून गरज पडल्यास तुम्हाला कोणाकडेही मागावे लागणार नाही. कौटुंबिक जीवनात सुसंवाद राहील.

**वृषभ**
एखादे काम पूर्ण करण्यासाठी नवीन पद्धती वापरून पाहू शकता. ऑफिसमध्ये सहकाऱ्यांसोबत नवीन प्रकल्पावर चर्चा करू शकता. कंपनीला फायदा होईल.

**मिथुन**
कुटुंबासोबत आनंदात वेळ घालवण्याचा अनुभव खूप छान असेल. कुटुंबात आनंदाचे वातावरण निर्माण होईल. प्रलंबित कामे पूर्ण कराल.

**कर्क**
नवीन ध्येयेही निश्चित कराल. जर इतरांवर अवलंबून राहण्याऐवजी मेहनतीवर आणि क्षमतेवर विश्वास ठेवलात तर गोष्टी सुरळीत होतील.

**सिंह**
जोडीदारासोबत चित्रपट पाहण्याची योजना कराल, ज्यामुळे नाते सुधारेल. व्यवसाय सुरळीत सुरू राहतील आणि जुन्या ग्राहकांकडून आर्थिक नफा मिळेल.

**कन्या**
दिवसाच्या सुरुवातीला काही गोंधळ होऊ शकतो, परंतु कुटुंबाच्या मदतीने सर्वकाही सोडवले जाईल. योजनेवर काम केल्याने चांगले परिणाम मिळू शकतात.

**तुळ**
मेहनतीचे पूर्ण फळ तुम्हाला मिळेल आणि तुम्ही जे काही हाती घ्याल ते यशस्वी होईल. तुमच्या ड्रेसिंग सेन्सची ऑफिसमध्ये प्रशंसा होईल.

**वृश्चिक**
अभ्यासासाठी आणि करिअरसाठी अधिक मेहनत करण्याची आवश्यकता आहे.. कोणतेही काम हाती घेण्यापूर्वी, रोजगाराच्या संधी मिळतील.

**धनु**
परिश्रम आणि समर्पणाने एखादे काम लवकर पूर्ण कराल. भविष्यात तुम्हाला लक्षणीय आर्थिक लाभ होतील. तुमचे वैवाहिक जीवन आज आनंदी राहील.

**मकर**
बदलत्या हवामानात, आरोग्याची काळजी घ्या आणि तळलेले पदार्थ टाळा. ऑफिसमधील कर्मचाऱ्यांसोबत व्यवसायाबाबत बैठक घेऊ शकता.

**कुंभ**
कामाची गुणवत्ता सुधारण्यावर लक्ष केंद्रित करू शकता. कुटुंबासाठी वेळ काढल्याने नातेसंबंध मजबूत होतील आणि आनंदी वातावरण निर्माण होईल.

**मिन**
भविष्यासाठी नवीन ध्येये निश्चित कराल. वैवाहिक जीवन आज आनंदी राहील आत्मविश्वास कमी होऊ देऊ नका. नकारात्मक लोकांपासून अंतर ठेवा.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज,खर्डी
मुंबई विद्यापीठाशी संलग्न "नॅक मूल्यांकन प्राप्त B Grade"
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE (IT)
UNDER GRADUATE: B.Sc. I.T., B.Sc. CHEMISTRY MATHS, B.A.F., BAMMC, B.Com., B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT, M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. GEOGRAPHY
Look forward to a BRIGHTER FUTURE
8669244522
9923992390

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://www.facebook.com/jeevandeepnews/
https://www.instagram.com/thane_jeevandeep/
https://x.com/Jeevandeepvarta
https://jeevandeepvarta.com/

### जिल्हा क्रीडा परिषद ठाणे व जिल्हा क्रीडा कार्यालय, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने

# राज्यस्तरीय शालेय रग्बी क्रीडा स्पर्धेचे आयोजन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद ठाणे व जिल्हा क्रीडा कार्यालय, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने सन 2025-26 या शैक्षणिक वर्षामध्ये शासकीय तालुकास्तर/ जिल्हास्तर/ विभागस्तर/ राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धेचे आयोजन विविध खेळ व वयोगटात करण्यात येते.

राज्यस्तरीय शालेय रग्बी (14 वर्षे मुले व मुली) क्रीडा स्पर्धा सन 2025-26 चे आयोजन करण्याची जबाबदारी ठाणे जिल्ह्याकडे सोपविण्यात आलेली आहे. ही स्पर्धा सेंच्युरी रेयॉन हायस्कूल, बी. के. बिर्ला मार्ग, शहाड, ता. उल्हासनगर, जि. ठाणे येथे दि.21 व 23 नोव्हेंबर 2025 या कालावधीत करण्यात येत आहे.

या स्पर्धेत महाराष्ट्रातील 8 विभागातून 16 संघातील सुमारे 304 खेळाडू मुले/मुली, मार्गदर्शक, अधिकारी, पंच सहभागी होत आहेत. तसेच जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा क्रीडा परिषद, ठाणे डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या संकल्पनेतून या वर्षी राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व खेळाडूंना ट्रॅक सूट तसेच प्राविण्यप्राप्त खेळाडूंना डिजीटल स्मार्ट वॉच अशी विशेष भेट वितरीत करण्यात येणार आहे, अशी माहिती ठाणे जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के यांनी दिली आहे.

# निवडणुकीसाठी इच्छुकांची चुळबुळ

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**वाशी :** नवी मुंबई महापालिकेच्या पंचवार्षिक निवडणुकीची प्रक्रिया वेगाने सुरू आहे.प्रभागरचना, आरक्षण सोडत जाहीर झाल्यानंतर राजकीय घडामोडींना वेग आला आहे, मात्र महायुती, महाविकास आघाडीची स्पष्ट भूमिका नसल्याने इच्छुक प्रचंड अस्वस्थ आहेत. महायुतीतील शिंदे गट, भाजप तसेच महाविकास आघाडीतील ठाकरे तसेच मनसे समर्थकांनी सोयीप्रमाणे काही प्रभागांत पॅनल तयार करण्यास सुरुवात केली असली तरी अंतिम आघाडी, महायुतीचा निर्णय अद्यापही धूसरच आहे. महायुती झाली, तर उमेदवारीच्या अंतिम समीकरणात बदल होण्याची शक्यता आहे. महायुतीमधील शिंदे सेना तसेच भाजपचे नाराज इच्छुक उमेदवारी मिळाली नाही, तर कोलांट्या मारण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे महाविकास आघाडी किंवा महायुती असे पर्याय इच्छुकांनी डोळ्यासमोर ठेवले आहेत. जर महायुती झाली खरी लढत शिंदे, भाजपच्या उमेदवारांमध्येच होणार आहे. त्यामुळे महायुती, महाविकास आघाडीचे ठरत नसल्यामुळे पक्षनिष्ठेपेक्षा स्वतःची ताकद दाखवण्याकडे अनेकांचा कल आहे.

**समाजमाध्यमांवर प्रचार**

समाजमाध्यमांवर निवडणुकीसाठी इच्छुक असल्याचे सांगत पक्षापेक्षा जनतेचा पाठिंबा महत्त्वाचा, असा संदेश देण्यास सुरुवात केली आहे, तर काही

### महायुती, आघाडीचे ठरत नसल्याने संभ्रमावस्था

ठिकाणी महायुतीतील नाराज पदाधिकारी आणि कार्यकर्ते महाविकास आघाडीतील प्रमुख घटक पक्षांच्या संपर्कात असल्याची माहिती आहे. त्यामुळे पक्षांतराची शक्यता वाढली असून, काही प्रभागांत संघर्ष चुरशीचा होण्याचे संकेत आहेत.

**अपक्ष लढण्याची तयारी**

महाविकास आघाडीत अस्वस्थता वाढल्याचे दिसते. महाविकास आघाडीत ठाकरे, मनसे एकत्र येणार असल्याची चर्चा आहे, पण काँग्रेस, शरद पवार गटाशी संवाद सुरू ठेवल्याचे बोलले जाते. काही ठिकाणी तर संभाव्य उमेदवारांनी तिकीट मिळाले नाही, तर अपक्ष लढण्याची तयारी आहे, तर युतीत शिंदे सेना, भाजपमधील युतीच्या निर्णयानंतर उमेदवारीचे अंतिम चित्र स्पष्ट होईल.



### उल्हासनगर महापालिका आयोजित

# जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा आनंदमयी वातावरणात संपन्न

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य तया जिल्हा क्रीडा परिषद ठाणे व उल्हासनगर महानगरपालिका द्वारे आयोजित जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा सन २०२५-२६ चे आयोजन मा. श्रीम, मनिषा आव्हाळे, प्रशासक तथा आयुक्त, मा. डॉ. धिरज चव्हाण, अतिरिक्त आयुक्त, मा. श्रओम, स्नेहा करपे, उप-आयुक्त, क्रीडा व सहायक आयुक्त मा. अजय साबळे, यांच्या मार्गदर्शनानुसार, पावसाळी जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पांचे आयोजन ७ सप्टेंबर २०२५ पासुन सुरू करण्यात आले होते दिनांक १८ नोव्हेंबर रोजी सेंच्युरी रेयॉन हायस्कूल, येथे १४, १७, १९ या वयोगटा खालील मुले/मुली यांची "आट्यापाट्या" क्रोडा स्पर्धाचे आयोजन करण्यात आलले होते. सदर "आट्यापाट्या" स्पध्येत १४ व १७ वर्ष वयोगटात मुले आणि मुलीन मध्ये महाराष्ट्र मित्र मंडळ शाळेचा पहिला क्रमांकाने विजय प्राप्त केलेला आहे. १९ वयोगटात वेदांत कॉलेजच्या मुलांचा प्रथम क्रमांक तर मुलींन मध्ये एस. एस. टी. कॉलेजने प्रथम क्रमांकाची बाजी मारली असुन क्रीडा अधिकारी, शांताराम चौधरी, यांच्या हस्ते ट्रॉफीचे वितरण करण्यात आलेले असुन सदर स्पध्यैस श्री. प्रमोद पारसी, सतिश राजगुरू, प्रफुल सर, सुभाष कोंडारी, म्हात्रे सर, बासुदेव खारीक, व इतर क्रीडा शिक्षक उपस्थित होते, व दिनांक दिनांक ११ सप्टेंबर रोजी पार पडलेली नेमबाजी" (एअर पिस्तुल) स्पर्ध्यत १४ वयोगटात सक्षम लोंढे, आर. जी. एस हायस्कूल, व खुशी भारती, बी. जी. तिलक हायस्कुल, १७ वयोगटात धनंजय भरत राठोड, आर.जी.एस हायस्कुल, युक्तो यश देवकुळे, सी.एच.एम. कॉलेज, तर १९ वयोगटात आदित्य पाल, आर.के.टी, कॉलेज, स्वरा मुळे, आर.जी.एस हायस्कुल, यांनी गोल्ड मेडल प्राप्त केलेले असुन विभागीय स्पध्ये करीता त्यांची निवड झालेली आहे. आजपर्यतच्या क्रीडा स्पर्धा उल्हासनगर महानगरपालिका क्रीडा विभागामार्फत राबविण्यात आलेल्या सर्व क्रीडा स्पर्धा ह्या मा. श्रीम, मनिषा आव्हाळे, प्रशासक तथा आयुक्त, मा. अतिरिक्त आयुक्त, डॉ. धिरज चव्हाण, मा. उप-आयुक्त, श्रीम. स्नेहा करपे, मा. सहायक आयुक्त, अजय साबळे, यांच्या मार्गदशनाखाली सर्व जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा ह्या एकंदरीत आनंदमयी वातावरणात पार पडलेल्या आहेत.

अशी माहिती महापालिका सहा. आयुक्त तथा जनसंपर्क अधिकारी अजय साबळे यांनी प्रसिद्धी पत्रकामार्फत दिली आहे.




# भिवंडी निजामपूर महापालिकेच्या प्रारूप मतदार याद्या आज प्रसिद्ध होणार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी :** भिवंडी निजामपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-2025 अनुषंगाने मा. राज्य निवडणूक आयोगाचे पत्र दि. 13/11/2025 नुसार प्राप्त प्रारुप मतदार यादी प्रसिद्धीचे कार्यक्रमाच्या अनुषंगाने दि.20/11/2025 रोजी एकूण 23 प्रभागांच्या प्रारुप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यांत येणार आहेत. प्रारुप मतदार याद्या संबंधित प्रभाग समिती कार्यालयामध्ये व महानगरपालिकेच्या मुख्यालयातील निवडणूक विभागामध्ये दि. 20/11/2025 ते दि. 27/11/2025 पर्यंत कार्यालयीन वेळेत नागरिकांना पाहण्याकरीता उपलब्ध राहणार आहेत. तसेच, सदरच्या याद्या महानगरपालिकेच्या स्व. परशराम टावरे क्रीडा संकुल, धोबी तलाव, भिवंडी येथील निवडणूक कार्यालयामध्ये वरील मुदतीत कार्यालयीन वेळेत मा.राज्य निवडणूक आयोगाचे दि. 08/10/2025 रोजीचे पत्रातील निर्देशानुसार निश्चित करण्यांत आलेले शुल्क आकारुन (प्रति पृष्ठ रु. 2/-प्रमाणे) विक्रीकरीता उपलब्ध राहणार आहेत.

**सदर प्रारुप मतदार याद्यांवर हरकती व सूचना दि. 20/11/2025 ते दि. 27/11/2025 या कालावधीमध्ये कार्यालयीन वेळेत संबंधित प्रभाग समिती कार्यालयामध्ये स्विकारल्या जातील. प्रारुप मतदार याद्यांच्या मतदारांच्या फोटी विरहीत प्रारुप मतदार याद्या महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळ bncmc.gov.in वर नागरिकांना पाहण्याकरीता व डाऊनलोड करण्याकरीता उपलब्ध राहणार आहेत.**

## कल्याण डोंबिवली महापालिकेतर्फे श्रीमती इंदिरा गांधी यांना जयंती निमित्त अभिवादन !



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या जयंती दिनानिमित्त महापालिका मुख्यालयात त्यांच्या प्रतिमेस अतिरिक्त शहर अभियंता प्रशांत भागवत यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यासमयी उपस्थित उपआयुक्त संजय जाधव, कांचन गायकवाड, माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे, सुरक्षा अधिकारी भरत बुळे, सहा. माहिती व जनसंपर्क अधिकारी सुमित बोयत व इतर कर्मचारी वर्ग यांनी देखील श्रीमती इंदिरा गांधी यांचे प्रतिमेस पुष्पसुमने अर्पण करून अभिवादन केले.

## सौ. कमलताई किसन कथोरे महाविद्यालयात भगवान बिरसा मुंडा यांना अभिवादन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण /दि.19**

भगवान बिरसा मुंडा यांची जयंती १५ नोव्हेंबर रोजी साजरी केली जाते, भारत सरकारने १५ नोव्हेंबर हा दिवस 'जनजाती गौरव दिवस' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे, जो बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त आहे. ते एक महान आदिवासी नेते, स्वातंत्र्यसैनिक आणि समाजसुधारक होते, ज्यांनी ब्रिटिश राजवटीविरुद्ध आणि जमीनदारी प्रथेविरुद्ध 'उलगुलान' नावाचे मोठे आंदोलन उभारले. त्यांना 'धरती आबा' म्हणजेच 'पृथ्वीचा पिता' म्हणून ओळखले जाते आणि आदिवासी समाजात त्यांचा मोठा आदर आहे. याच अनुषंगाने दि. १५ नोव्हेंबर, २०२५ रोजी सौ. कमलताई किसन



कथोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय म्हसा येथे भगवान बिरसा मुंडा यांची १५० वी जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. योगेश माळी सर यांच्या शुभ हस्ते भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात झाली.

या प्रसंगी काही विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले तसेच प्राचार्य माळी सरांनी उपस्थितांना आजच्या दिवसाचे महत्त्व पटवून देत विस्तृत असे मार्गदर्शन केले. या वेळी जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रविंद्र घोडविंदे सर, संचालिका मा. सौ. स्मिता घोडविंदे मॅम, संचालक मा. श्री. प्रशांत घोडविंदे सर , महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. योगेश माळी सर यांचे विशेष सहकार्य तथा मार्गदर्शन लाभले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मयुरी घागस मॅडम यांनी केलं तर प्रा. कन्या हरड मॅडम यांनी आभारप्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



## कल्याण डोंबिवली महानगरपालिका

**महापालिका प्रशासकीय इमारत, शंकरराव चौक, कल्याण (पश्चिम)**

**कल्याण डोंबिवली महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५**

### प्रारुप प्रभाग मतदार यादी प्रसिध्दीची जाहीर सूचना

कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील नागरीकांना व सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील पत्र क्रमांक रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४१/का.५, दि.१३/११/२०२५ अन्वये कल्याण डोंबिवली महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता प्रभाग मतदार यादी प्रसिध्दीचा सुधारीत कार्यक्रम खालीलप्रमाणे घोषित केला आहे.

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची/ पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे | दि. २०/११/२०२५ |
| २ | प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | दि. २०/११/२०२५ ते दि. २७/११/२०२५ |
| ३ | अंतिम प्रभागनिहाय मतदार याद्या प्रसिध्द करणे | दि. ०५/१२/२०२५ |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७ अ च्या तरतूदीन्वये, कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात असलेल्या १३८ कल्याण पश्चिम, १४२ कल्याण पुर्व, १४३ डोंबिवली व १४४ कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या दिनांक ०१/०७/२०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या मतदार याद्यांवरुन कल्याण डोंबिवली महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी प्रारुप मतदार याद्या तयार करण्यात आल्या आहेत व त्या मा. राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये आज दिनांक २०/११/२०२५ रोजी खालील नमूद ठिकाणी त्यासमोर नमुद निवडणुक प्रभागांच्या प्रारुप मतदार याद्या माहितीसाठी आणि निरीक्षणासाठी प्रसिध्द करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | ठिकाण | निवडणूक प्रभाग क्रमांक |
|---|---|---|
| १ | '१/अ' प्रभाग क्षेत्र कार्यालय, कल्याण डोबिवली महानगरपालिका, ऑइल मिल जवळ, वडवली, ता. कल्याण. | २,३,४ |
| २ | '२/ब' प्रभाग क्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, संघवी इस्टेट, बारावे रोड, कल्याण पश्चिम. | १, ५, ६, १० |
| ३ | '३/क' प्रभाग क्षेत्र कार्यालय, अग्नीशमन केंद्राजवळ आधारवाडी, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण पश्चिम. | ७, ८, ९ |
| ४ | '४/जे' प्रभाग क्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका. भगवती अभिलाषा कन्व्हेंचर, धनलक्ष्मी अपार्टमेंट जवळ, लोकग्राम रेल्वे टिकीट काऊंटर समोर, लोकग्राम, कल्याण (पुर्व). | ११, १२, १८ |
| ५ | '५/ड' प्रभाग क्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका (राष्ट्रसंत तुकडोजी महाराज प्रभाग कार्यालय), पुना लिंक रोड, काटेमानिवली, कल्याण पूर्व. | १३, १४, १५ |
| ६ | '६/फ' प्रभाग क्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, पीपी चेंबर, भगतसिंग रोड, डोंबिवली पूर्व | २०, २६, २७ |
| ७ | '७/ह' प्रभाग क्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, रेतीबंदर रोड, उमेश नगर, २ पाण्याच्या टाकी जवळ, डोंबिवली पश्चिम. | २१, २२, २३, २४, २५ |
| ८ | '८/ग' प्रभाग क्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, सुनिल नगर, डिएनसी रोड, बहिणाबाई उद्यानाच्या मागे, डोंबिवली पूर्व. | २८, २९ |
| ९ | '९/आय' प्रभाग क्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, मंगेशी संस्कार इमारत,विंद्या वासीनी हिंदी शाळेजवळ, खडेगोळवली, विठ्ठलवाडी पूर्व. | १६, १७, ३१ |
| १० | १०/ई' प्रभाग क्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, रिजेन्सी कॉम्प्लेक्स, दावडी रोड, वेंकटेश पेट्रोल पंप जवळ, डोंबिवली पूर्व. | १९, ३० |

तसेच, प्रस्तुत १ ते ३१ प्रभागांच्या प्रारुप मतदार याद्या www.kdmc.gov.in या वेबसाईटवर व निवडणूक विभाग, मुख्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, शंकरराव चौक, कल्याण पश्चिम येथे निरिक्षणासाठी उपलब्ध राहतील. तसेच उपरोक्त प्रभाग क्षेत्र कार्यालय येथे त्यांचे कार्यालयातील निवडणूक प्रभागांच्या प्रारुप मतदार याद्या विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

सदरील प्रारुप मतदार याद्यांवर कोणाच्या हरकती अगर सूचना असल्यास त्या प्राधिकृत अधिकारी यांचे नावे संबंधित प्रभाग कार्यालय यांचेकडे दिनांक २०/११/२०२५ ते २७/११/२०२५ अखेर सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० या वेळेत लेखी स्वरुपात दाखल कराव्यात.

- निवडणूक प्रभागांच्या प्रारुप मतदार याद्यांवरील हरकती अगर सूचना संबंधित प्रभाग क्षेत्र कार्यालय येथे स्विकारल्या जातील, अन्यत्र स्विकारल्या जाणार नाहीत.
- हरकती/सूचना टपालाद्वारे, कुरीयरद्वारे व ई-मेलद्वारे तसेच कोणत्याही इलेक्ट्रॉनिक मिडीयाद्वारे प्राप्त होणाऱ्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.
- वैयक्तीक हरकती स्विकारल्या जातील, गठ्ठयामध्ये प्राप्त होणाऱ्या हरकती स्विकारल्या जाणार नाहीत.
- मुदतीनंतर हरकती/सूचना स्विकारल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**सर्वसाधारणपणे खालील मुद्यांवर हरकत/सूचना विचारात घेतली जाईल :**

१) लेखनिकांच्या काही चुका असल्यास त्या बाबतची हरकत/सूचना विचारात घेतली जाईल.
२) दुसऱ्या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झाले असतील तर त्यांची नांवे त्या प्रभागातून वगळण्या बाबतची व योग्य त्या प्रभागात समाविष्ट करण्याबाबतची हरकत /सूचना विचारात घेतली जाईल.
३) महानगरपालिकेच्या संबंधित प्रभागाच्या क्षेत्रातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नावे असूनही, महानगरपालिकांच्या संबंधित मतदार यादीमध्ये त्यांची नावे वगळण्यात आली असल्यास, त्याबाबतची हरकत/सूचना विचारात घेवून अशा मतदारांची नांवे मतदार यादीत समाविष्ट करण्यात येतील.

**टीप:**

१) आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास म्हणजे दिनांक ०१/०७/२०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीचे विभाजन करुन या महानगरपालिकेच्या मतदार याद्या बनविण्यात आलेल्या असल्याने यामध्ये नव्याने नांव मतदार यादीत समाविष्ट करण्यात येणार नाहीत किंवा वगळण्यात येणार नाहीत.
२) प्रारुप यादीवरील हरकती/सूचनांवरील निर्णय घेतांना मा. राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अंतिम निर्णय घेतला जाईल.
३) हरकती व सूचना सादर करण्याचे विहित नमुने संबंधित सहाय्यक आयुक्त, प्रभागक्षेत्र कार्यालय येथे तसेच www.kdmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. या विहित नमुन्यातच हरकती/सूचना/ तक्रारी स्विकारल्या जातील, याची नोंद घ्यावी.

**हे सर्व संबंधितांच्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी जाहीर करण्यात येत आहे.**

**ठिकाण : कल्याण दिनांकः १९/११/२०२५**
**जावक क्रमांक : कडोंमपा/जसंवि मुका/६८९**
**दिनांक :- १९/११/२०२५**

**सही/-**
**(अभिनव गोयल) भा.प्र.से.**
**आयुक्त तथा निवडणूक अधिकारी,**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका.**



# प्राध्यापक हरेश खारिक यांना मानद डॉक्टरेट बहाल !

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भातसानगर दि.17 (वार्ताहर) :**

शहापूर तालुक्यातील म.ना.बरोरा माध्यमिक विद्यालय व शा.ग काबाडी उच्च माध्यमिक विद्यालयातील मराठी या विषयाचे प्राध्यापक हरेश खारीक यांना पुणे येथे झालेल्या कार्यक्रमात त्यांनी केलेल्या विशेष कार्याबद्दल मानत डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. त्यांचे तालुक्यात कौतुक होत आहे

म.ना बरोबर माध्यमिक विद्यालय व शा.ग.काबाडी उच्च माध्यमिक विद्यालयात मराठी या विषयाचे पारंगत असलेले हरेश खारीक यांनी शाळांचा कायम ते अनुदानाचा प्रवास ,विविध शैक्षणिक संस्था या अनुदानाच्या प्रवाहात आणणे ,शैक्षणिक साहित्य वाटप , आदि समाजासाठी केलेल्या विशेष कार्याची दखल घेत अमेरिकेतील नामांकित युनिव्हर्सिटीने त्यांच्या दीर्घ काळाच्या निष्ठेची योग्य दखल घेत पुणे येथे एका खास कार्यक्रमांमध्ये मानत डॉक्टरेट पदवी बहाल केली आहे. शा.ग.काबाडी उच्च माध्यमिक विद्यालयात गेली अठरा वर्षापासून ज्ञान दानाचे काम ते करीत आहेत. विशेष म्हणजे आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी ते सातत्याने प्रयत्न करीत असतात. त्यांना या मिळालेल्या पुरस्काराबद्दल शिक्षक वर्ग पालक व विद्यार्थ्यांकडून त्यांचे कौतुक होत आहे

ठाणे ■ गुरुवार
२० नोव्हेंबर २०२५
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
पान ४

# भारतीय संविधानातील मूल्य जपणारा प्रवाहच मुख्य : प्रा. आशालता कांबळे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** भारतीय संविधानातील मूल्यांची जपणूक करणारा प्रवाहच मुख्य प्रवाह आहे. दुःख आणि संघर्षावर मात करून विजय मिळविणाऱ्या स्त्रीचा आवाज 'जेव्हा ती बोलू लागते' या कवितांतून प्रभावीपणे समोर येतो, म्हणून या कविता आपल्याला जवळच्या वाटतात, असे मत ज्येष्ठ आंबेडकरी साहित्यिका व कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्रा. आशालता कांबळे यांनी येथे व्यक्त केले.

पश्चिमेकडील आचार्य अत्रे रंगमंदिराच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ता कवयित्री सुरेखा पैठणे यांच्या 'जेव्हा ती बोलू लागते' या पहिल्या काव्यसंग्रहाचे डॉ. श्यामल गरुड, प्रा. डॉ. सुदाम राठोड, डॉ. विठ्ठल शिंदे, सामाजिक कार्यकर्त्या नंदा कांबळे आणि सहायक आयुक्त शैलेश दोंदे यांच्या हस्ते प्रकाशन शनिवारी करण्यात आले.

या कार्यक्रमात मिलिंद जाधव, अक्षय भोईर आणि वैभवी अडसुळे यांनी प्रभावी कविता वाचन केले. यावेळी प्रा. सिद्धार्थ मोरे, बबन सरवदे, छाया कोरेगावकर, सिंधू रामटेके, उत्तम जोगदंड, शिवा इंगोले, राज असोरेंडकर, सुधीर चित्ते, दुहिता जाधव यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती होती.

# पडघा ग्रामपंचायतीच्या कर सवलत योजनेला नागरिकांचा प्रतिसाद

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा :** भिवंडी तालुक्यातील पडघा ग्रामपंचायतीच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या "मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान" योजनेअंतर्गत नागरीकांना देण्यात येणाऱ्या मालमत्ता, पाणीपट्टी ५० टक्के कर सवलतीला चांगला प्रतिसाद मिळत आहे.शिवसेना नेते प्रकाश पाटील यांच्या सुचनेनुसार पडघा ग्रामपंचायतीचे आर्थिक स्वावलंबन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाची "मुख्यमंत्री समृद्ध



पंचायतराज अभियान"योजना पडघा ग्रामपंचायतीच्या सरपंच सायली संजय पाटील, ग्रामपंचायत अधीकारी भास्कर घुडे ग्रामपंचायत कमीटी यांच्या मार्गदर्शनाखाली राबवीली जात असुन ग्रामपंचायत हद्दीतील निवासी मालमत्ता ,पाणीपट्टी आणि दिवाबत्ती कर थकबाकी मध्ये ५० टक्के सवलत देण्यात येत आहे.त्यामधे सन २०२५-२६ म्हणजे चालू वर्षाचा पूर्ण कर नागरीकांना एक रकमी भरावा लागणार असुन १ एप्रिल २०२५ पूर्वीच्या थकबाकी मध्ये ५० टक्के सवलत जाहीर करण्यात आली आहे. ही ५० टक्के सवलत रक्कम सुध्दा एक रकमी भरावी लागणार आहे. सदर सवलत फक्त अभियान कालावधी करीता म्हणजे ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत लागू असेल.चालू वर्षाचा कर (घरपट्टी, पाणीपट्टी, दिवाबत्ती कर )आणि मागील थकबाकीच्या ५० टक्के कर एक रकमी भरला तरच ही सवलत लागू होईल.असे पडघा ग्रामपंचायतीच्या वतीने सांगण्यात आले या सवलत योजनेस नागरीकांचा ग्रामपंचायतीस भरघोस प्रतिसाद मिळत असुन सदर कर सवलतीचा जास्तीत जास्त नागरीकांनी लाभ घ्यावा असे आवाहन ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आले आहे.


## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**शहर अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे कार्यालय**

**ई– निविदा क्र.२६५ (२०२५–२६)**

उल्हासनगर महानगरपालिका शहरामधील खालील नमुद कामे योग्य वर्गातील ठेकेदाराकडून निविदा प्रणाली पध्दतीनुसार महानगरपालिकेच्या अटी व शर्तीस अधिन राहून दिनांक २०/११/२०२५ रोजी निविदा मागविण्याकरीता प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर निविदा प्रणालीबाबत इतर आवश्यक माहिती https://mahatenders.gov.in/ या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

**ई– निविदा क्र.२६५ (२०२५–२६)**

| अ.क्र. | निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम (जी.एस.टी वगळून) | इसारा रक्कम | कालावधी | वर्गवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | उमपा/साबांवि/नोटीस/ २०२५-२६/२६५ | सार्वत्रिक निवडणुक २०२५ करीता मतदान केंद्राची दुरुस्ती करणे (प्रभाग क्षेत्र क्र.३ ) | ६४८२३७२ | ६५००० | १ महिना | NA |

सदर निविदा प्रणालीबाबत इतर आवश्यक माहिती https://mahatenders.gov.in/ या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

**सही /-**
**कार्यकारी अभियंता (साबांवि)**
**उल्हासनगर महानगरपालिका**

**जा.क्र.उमपा/पीआरओ/ ३९२/२०२५**
**दिनांक :- १९/११/२०२५**


# शिक्षक भारतीचा कृतज्ञता सोहळा व सहविचार सभा संपन्न



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण :** शिक्षक भारती ठाणे जिल्ह्याच्या वतीने नुकताच शहापूर तालुक्यात वासिंद परिसरात शिक्षक भारतीचा कृतज्ञता सन्मान सोहळा व सहविचार सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत पुरोगामी विचारसरणी आणि शिक्षक भारतीच्या विचारांशी सेवानिवृत्त होईपर्यंत संलग्न असणाऱ्या सत्कारमूर्तींचा स्वागत व सत्कार करण्यात आला. यामध्ये विलास साळवे , प्रकाश पाटील , गुरुनाथ तिवरे , बाजीराव भोईर , दामोदर दिनकर , अरुण मडके , सुरेश विशे , जयवंत मोगरे , श्यामसिंग परिहार , इम्रान सर हे उपस्थित होते. या सेवानिवृत्त शिक्षकांना सन्मानचिन्ह, शाल आणि बुके देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. शिक्षक भारतीच्या सहविचार सभेमध्ये शिक्षकांना लागू केलेल्या टीईटी परीक्षेबद्दल नाराजी आणि विचार मंथन करण्यात आले. अनेक शिक्षकांनी त्यावर प्रश्न उपस्थित केले आणि शासनाच्या या निर्णयाला विरोध करण्यासाठी येत्या हिवाळी अधिवेशनामध्ये 10 डिसेंबरला नागपूर येथे होणाऱ्या मोर्चात सहभागी होण्याचे सर्वांना आवाहन करण्यात आले. त्याचबरोबर हायकोर्ट बॉम्बे यांनी नाशिक संदर्भात दिलेल्या निर्णयानुसार आदिवासी क्षेत्रात व पेसा क्षेत्रात काम करणाऱ्या शिक्षकांना फरकासह एकस्तर वेतन श्रेणी देण्यात यावी. यासंदर्भातली मागणी मा. शिक्षणाधिकारी, जि प ठाणे यांच्याकडे करण्यासंदर्भात निर्णय झाला. त्यांनी मागणी मान्य न केल्यास कोर्टात याचिका दाखल करण्याचेही ठरवण्यात आले. वस्ती शाळा शिक्षकांची मूळ सेवा व तिचे लाभ शिक्षकांना मिळावेत. या संदर्भात चर्चा करण्यात आली. ठाणे जिल्ह्यातील विविध शाळा व शिक्षकांच्या अनेक प्रश्नांवर चर्चा झाली आणि हे प्रश्न सोडवण्यासाठी शिक्षक भारती अग्रेसर असेल. तसेच, शिक्षक भारती संघटनेची सभासद नोंदणी व बांधणी मोठ्या प्रमाणात करण्यासंदर्भात ही चर्चा करण्यात आली. या सभेला मधुकर नारखेडे , रमेश तारमळे , गुरूनाथ तिवरे , जिल्हाध्यक्ष एकनाथ तारमळे, जिल्हाध्यक्ष सुरेश विशे, नामदेव बांगर , फैय्याज यांनी चांगले मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी आणि सभेला नवी मुंबई, ठाणे, भिवंडी, कल्याण व शहापूर परिसरातून अनेक शिक्षक बांधव उपस्थित होते. रविवारी अनेक ठिकाणी लग्नकार्य, साखरपुडे, उत्तर कार्य व दुःखद घटना घडल्या असतांना सुद्धा शिक्षक मोठ्या प्रमाणात उपस्थित राहिले. कार्यक्रम व सभेचे सूत्रसंचालन जयवंत मोगरे यांनी केले. सर्व शिक्षक व पदाधिकारी शिक्षकांनी उत्स्फूर्तपणे सभेत सहभाग घेतला. शिक्षक भारती संघटनेची एकजूट या ठिकाणी दिसून आली.


## भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

**भिवंडी.जि.ठाणे.**

**पाणी पुरवठा विभाग**

**ई - निविदा सुचना क्रमांक - ३९ (पहिल्यांदा प्रसिध्दी) सन २०२५-२६**

**खालील काम करण्याकरीता सक्षम व अनुभवी ठेकेदारांकडून ई निविदा मागविण्यात येत आहे.**

| अ. क्र. | कामाचे स्वरुप | अंदाजित खर्च | निविदा फॉर्म फी | निविदा विक्री व स्विकारण्याची अंतिम दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | मा. खासदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम २०२५-२६ अंतर्गत वार्ड क्र.२ ममता टाकी ते रिव्हीयर पाम पर्यंत पाणी पाईपलाईन टाकणे. ता. भिवंडी **सन २०२५-२६ या.** | रु. ३,९९,९१४/-- | रु. २३६०/- | दि. २०/११/२०२५ ते दि. २७/११/२०२५ |
| २ | मा. खासदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम २०२५-२६ अंतर्गत वार्ड क्र.२ मध्ये शेर ए रझा मस्जिद, हाजी कंपाउंड व्ही.पी. नका व नूर पॅलेस जवळ जुना अलराझी हॉस्पिटल व्ही.पी. नका येथे बोअरवेल चे काम करणे, ता. भिवंडी **सन २०२५-२६ या.** | रु. २,९९,६०१/- | रु. २३६०/- | |
| | सदर निविदा बाबतची माहिती मनपा संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in वर दिनांक २०/११/२०२५ पासुन उपलब्ध आहे | | | |

**सही /-**
**प्र. कार्यकारी अभियंता,**
**पाणी पुरवठा विभाग**
**भिवंडी नि. शहर महानगरपालिका भिवंडी.**

**जा.क्र./ज.सं.वि./१४०३**
**दि. १९/११/२०२५**


# लाखाच्या दागिन्यांची चोरी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे:** वागळे इस्टेट, किसननगर भागात राहणारे सुहास कदम हे आपल्या कुटुंबासह गावाला नातेवाईकांना भेटण्यासाठी गेले होते. त्याच दरम्यान चोरट्यांनी त्यांच्या घराच्या दरवाजाचे लॉक तोडून एक लाख सहा हजारांच्या सोन्याच्या दागिन्यांची चोरी केल्याची माहिती श्रीनगर पोलिसांनी दिली. कदम हे गावी गेल्यानंतर १४ नोव्हेंबर रोजी रात्री २ ते १६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी चारच्या दरम्यान त्यांच्या घराच्या दरवाजाचा कडीकोयंडा तोडून घरात शिरकाव केला.


## ठाणे महानगरपालिका, ठाणे

जाहीर सूचना
ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५
प्रभाग निहाय प्रारुप मतदार याद्या प्रसिध्दीबाबत.

मा.राज्य निवडणूक आयोगाने पत्र क्र.रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४१/का-५, दिनांक १४.१०.२०२५, दिनांक ०४/११/२०२५ व दिनांक १३.११.२०२५ अन्वये जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार दिनांक ०१.०७.२०२५ रोजी मा.भारत निर्वाचन आयोगाने प्रसिध्द केलेल्या १४४ कल्याण ग्रामीण, १४६ ओवळा-माजिवडा, १४७ कोपरी पाचपाखाडी, १४८ ठाणे, १४९ मुंब्रा-कळवा या विधानसभेच्या ठाणे महानगरपालिका हद्दीतील मतदार यादी प्रभाग निहाय विभागून ठाणे महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारुप प्रभाग मतदार याद्या दि. २०.११.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येत आहेत.

दिनांक २०.११.२०२५ ते दिनांक २७.११.२०२५ या कालावधीत खालील मुद्दयांवर नागरिकांकडून सदर प्रारुप प्रभाग मतदार यादीवर हरकती व सूचना मागविण्यात येत आहेत.

१) लेखनिकांच्या काही चुका .
२) दुसऱ्या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झालेले.
३) संबंधित प्रभागातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नावे असूनही, महानगरपालिकेच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नावे वगळण्यात आली असल्यास, अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करणे.
४) मृत व्यक्तींची नावे आढळल्यास किंवा त्याबाबत हरकती व सूचना प्राप्त झाल्यास त्याची नोंद मार्क कॉपी मध्ये घेणे.

उपरोक्त नमूद मुद्दयांवरील लेखी हरकती व सूचना महापालिकेच्या खालील पत्त्यावर विहित मुदतीत कार्यालयीन वेळेत स्विकारण्यात येतील. वरील नमुद मुद्दयांव्यतिरिक्त अन्य मुद्दयांवरील हरकती व सूचना स्विकारल्या जाणार नाहीत. तसेच उपरोक्त मुद्दया व्यतिरिक्त आणि मुदतीनंतर दाखल झालेल्या हरकती व सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत. याकरीता मुदतीत हरकती दाखल कराव्यात.

| अ. क्र. | प्रभाग क्र. | संबंधित प्रभागांबाबतच्या मतदार यादीतील हरकती दाखल करण्याचे कार्यालय |
|---|---|---|
| १ | १, २, ३, ८ | सहाय्यक प्राधिकृत अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त माजिवडा मानपाडा प्रभाग समिती |
| २ | १०, ११, १२ | सहाय्यक प्राधिकृत अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त उथळसर प्रभाग समिती |
| ३ | ४, ५, ७ | सहाय्यक प्राधिकृत अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त वर्तकनगर प्रभाग समिती |
| ४ | ६, १३, १४, १५ | सहाय्यक प्राधिकृत अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त लोकमान्यनगर-सावरकरनगर प्रभाग समिती |
| ५ | १६, १७, १८, | सहाय्यक प्राधिकृत अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त वागळे प्रभाग समिती |
| ६ | १९, २०, २१, २२ | सहाय्यक प्राधिकृत अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त नौपाडा-कोपरी प्रभाग समिती |
| ७ | ९, २३, २४, २५ | सहाय्यक प्राधिकृत अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त कळवा प्रभाग समिती |
| ८ | २६, ३०, ३१, ३२ | सहाय्यक प्राधिकृत अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त मुंब्रा प्रभाग समिती |
| ९ | २७, २८,२९, ३३ | सहाय्यक प्राधिकृत अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त दिवा प्रभाग समिती |

मा. राज्य निवडणूक आयोगाकडून हरकत/सूचना नोंदविणेकरीता मतदारांसाठी नमुना-अ व तक्रारदारांसाठी नमुना-ब छापिल विहित नमुन्यातील अर्ज सादर करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार सदरचे नमुना-अ व नमुना-ब छापिल अर्ज सर्व प्रभाग समितीमध्ये उपलब्ध आहेत.

उपरोक्त नमूद तक्त्याप्रमाणे संबंधित प्रभागांच्या मतदार यादीवरील हरकती या फक्त वरील तक्त्यात नमूद सहाय्यक प्राधिकृत अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (संबंधित प्रभाग) यांचे कार्यालयात (नमुना-अ व नमुना-ब) लेखी (हार्ड कॉपी) स्वरुपात दाखल कराव्यात. त्या व्यतिरिक्त अन्य ठिकाणी, अन्य कार्यालयात दाखल केलेल्या हरकती व सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत. तसेच ऑनलाईन स्वरुपात व ठाणे महानगरपालिकेच्या ई-मेलवर दाखल केलेल्या हरकती व सूचना स्विकारल्या जाणार नाहीत.

प्रस्तूत प्रभागांच्या प्रारुप प्रभाग मतदार याद्या www.thanecity.gov.in या वेबसाईटवर, महानगरपालिका मुख्यालय (निवडणूक विभाग) आणि सर्व प्रभाग समिती कार्यालय येथे पाहण्यासाठी प्रसिध्द करण्यात येत आहेत. निवडणूक विभाग, मुख्यालय येथे सदर मतदार याद्याची आगाऊ मागणी नोंदविल्यास, नागरी सुविधा केंद्र, महापालिका मुख्यालय येथे शुल्क भरुन विक्रीसाठी उपलब्ध केल्या जातील.

ठामपा/पिआरओ/निवडणूक/८९६/२०२५-२६
दि:१९.११.२०२५

सही/-
सौरभ राव, भाप्रसे
प्रशासक तथा आयुक्त
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**Pls visit our official web-site www.thanecity.gov.in**

**अनधिकृत बांधकामाला आळा घाला..**
**अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !**


## ठाणे जिल्हा शूटिंगबॉल असोसिएशन तर्फे

# जिल्हास्तरीय निवड चाचणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाण्यातील नवोदित खेळाडूंना प्रोत्साहन देऊन राज्यस्तरीय स्पर्धामध्ये ठाण्याचे भक्कम प्रतिनिधित्व व्हावे हा या उपक्रमाचा उद्देशाने आमदार निरंजन डावखरे यांचे नेतृत्वाखाली व उपाध्यक्ष हिमांशू साळवी, सचिन मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे जिल्हा शूटिंगबॉल असोसिएशन तर्फे उपज्युनियर (अंडर -१७ ) ज्युनियर (अंडर - 19 ) आणि सीनियर (मुल -मुली ) या गटांसाठी जिल्हास्तरीय निवड चाचण्यांचे रविवार दिनांक 23 नंबर 2025 रोजी सकाळी 9.00 वाजल्यापासून पुढे ही निवड चाचणी कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज मैदान, रोड क्रमांक 16, नेहरूनगर जवळ, वागळे फायर ब्रिगेड मागे, वागळे इस्टेट,ठाणे येथे आयोजन करण्यात आले आहे.

ठाण्यात शूटिंगबॉल या खेळाचा समृद्ध वारसा आहे. या खेळाची पायाभरणी अगरी सेना प्रमुख राजाराम रामा साळवी आणि माजी महापौर मनोहर रामा साळवी यांनी केली असून त्यांची दूरदृष्टी आजही या खेळाच्या प्रगतीस प्रेरणा देत आहे.

सचिव निखिल प्रवीण शेडगे यांनी जिल्हा क्रीडा अधिकारी तसेच शाळांतील क्रीडा शिक्षकांशी संपर्क साधून व्यापक सहभाग सुनिश्चित केला आहे.

यावेळी समितीचे उपाध्यक्ष राजेश आंगणे, दीपक सावंत, संयुक्त सचिव संभाजी पाटील, खजिनदार विजय आदक, संयुक्त खजिनदार मिलिंद साटम तसेच सदस्य विजय गोंधळी, एकनाथ पवळे, यश धनावडे आणि रीमा देवरुखकर यांचा सक्रिय सहभाग असणार आहे .

सर्व शाळा, प्रशिक्षक आणि खेळाडूंनी या निवड चाचण्यामध्ये उत्साहाने सहभागी व्हावे आणि ठाण्याचा खेळाडूवृत्तीचा वारसा अधिक मजबूत करावा असे आवाह ठाणे जिल्हा शूटिंगबॉल असोसिएशनच्या वतीने करण्यात येत आहे.

# पेणमध्ये साई बाबांच्या मिरवणुकीचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** श्री साई बाबांची मानाची पालखी मिरवणूक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ओम साई पदयात्रा मित्र मंडळ पेण तर्फे भव्यदिव्य मिरवणुकीचे पेण शहरात आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार 20 नोव्हेंबर 2025 रोजी सायंकाळी संपूर्ण पेण शहर साईमय वातावरणात न्हाऊन निघणार आहे. पेण साई मंदिर कासार तलाव येथून सायंकाळी ४:३० वाजता विद्युत रोषणाई, ब्रॉसबँड पथकाच्या सुंदर संगीताच्या तालावर मिरवणुकीला प्रारंभ होणार आहे. या मिरवणूक सोहळ्यामध्ये चलचित्र रथ शामिल होणार आहेत. यामध्ये द्वारकामाई मंदिर, बैलगाडी हाकताना साईबाबा, हुबेहुब दिसणारे साईबाबा यांचा विशेष समावेश असणार आहे.

पेण साई मंदिरा पासून सुरू होणारी मिरवणूक तेरा घरांची आळी, चावडी नाका, आंबेडकर चौक, नगरपालिका चौक, राजू पोटे मार्ग, कोळीवाडा, महाविर मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, कासार आळी, हनुमान आळी आणि पुन्हा साई मंदिर येथे फिरणार आहे. आदर्श आचार संहितेचे पूर्ण पालन करून पालखी मार्गावर सर्वत्र भगवे पताके, भगवे झेंडे लावण्यात आले आहेत. घरासमोर मिरवणूक आल्यानंतर प्रत्येक महिला आरती ओवाळून औक्षण करत असते. शेवटी साई बाबांच्या मंदिरात महाआरतीने व महाप्रसादाने मिरवणुकीची सांगता होणार आहे.

त्यानंतर शुक्रवारी सकाळी 6 वाजता साई बाबांची पालखी पायी चालत शिर्डीकडे मार्गस्थ होणार आहे. गेली 17 वर्ष ओम साई पदयात्रा मित्र मंडळ पेण ते शिर्डी पर्यंत साई पालखीची सेवा करत आहेत. सदर पालखी मिरवणूक सोहळा यशस्वी करण्यासाठी ओम साई पदयात्रा मित्र मंडळाचे सर्वेसर्वा कल्पेश ठाकूर, मितेश भानुशाली व त्यांचे सहकारी साई सेवक गेली दोन महिने दिवस रात्र मेहनत घेत आहेत. पेणकर वर्षभर या श्री साई बाबांच्या भव्यदिव्य मिरवणुकीची वाट पाहत असतात. सदर मिरवणुकीत सर्वांनी हजारोंच्या संख्येने सामील होण्याचे आवाहन अपघातग्रस्तांचे मदतगार तथा साई सेवक कल्पेश ठाकूर यांनी केले आहे.






Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024